# संयुक्त गट ब व क परिक्षा

# Where

# Which

# When

# Most Important : HOW

## (Part -1)

***From:*** *Amit Pitambare*

***STI 2023 : PROVISIONAL RANK 24***

***ASO 2023 : PROVISIONAL RANK 24***

***Marathi &English Paper – 172 (86 Que/ Attempted 96)***
***General Studies Paper – 118.5 (Attempted que 83)***

**Co-operative Officer : State Rank 11**
**Talathi : Chandrapur**

Uploaded by mpscpoint.in

२०२५ पासुन राज्यसेवा परिक्षेतील (वर्णनात्मक परिक्षा) हा संभावित बदल लक्षात घेता संयुक्त गट ब व क परिक्षामध्ये उत्तीर्ण होण्याचे आव्हान अधिक कठिण होणार आहे. तेव्हा फक्त टॉपर विद्यार्थ्यांचे Motivational Video पाहुन आपण उत्तीर्ण होऊ असे वाटत असेल तर ते दिवसाढवळया स्वप्न पाहण्यासारखे आहे. माझा Combined परिक्षेचा आता पर्यंतचा प्रवास हा साप-शिडी सारखा राहीला आहे. मात्र, या सगळया चुकातून धडा घेवुन मी कसा बाहेर पडलो व हा अनुभव इतर विद्यार्थ्यांना उपयोगी ठरावा यासाठी हा प्रयत्न !

## 1. **Where (पूणे की इतर)**

मी स्वतः पूणे येथे सूमारे ३.५ वर्षाहून अधिक काळ राहत होतो. तेथे असतांना अगदी Rigid Timetable Follow केला (७ ते ११ लायब्ररी) मात्र Combined च्या मुख्य व राज्यसेवा मुख्य देण्याचा सुखाव्यतीरिक्त फायनल लिस्ट मध्ये नाव दिसण्याचे सौभाग्य लाभले नाही. २०२२ पासून मी घरी (नागपूर) राहून अभ्यास केला ..**No Library & जॉब** करत. त्यामुळे पुण्यातच वातावरण आहे.. घरी राहून पास होता येत नाही, ही कल्पना सोडून दयायला हवी.

## 2. **Which (राज्यसेवा की Combined)**

स्पष्ट शब्दात सांगायचे झाल्यास दोन्ही Exam च्या Requirment वेगवेगळया आहेत कारण दोघांचा Syllabus वेगळा आहे (विश्वास बसत नसल्यास Syllabus पाहून घ्या!) त्यामुळे कोणत्याही टॉपर, मित्र-मैत्रीण यांना विचारण्यापेक्षा आपली बौध्दीक, आर्थिक, मानसिक, शारीरीक गरज व कुवत ओळखुन राज्यसेवा की Combined Decide करावी. Exam मध्ये २ ते ३ महिन्यांचा Gap असल्यासच दोन्ही दगडावर पाय ठेवण्याचा विचार करावा.

## 3. **When**

जाहिरात आल्यावर अभ्यासाला लागलो तर रिवीजन न होणे, टेस्ट सिरीजला निट परफार्म न करणे, Exam हॉल मध्ये Under Pressure राहणे हे सगळे घडून येते. हे व्हायच नसेल तर ॲड किती मोठी असणार, जागा वाढणार का, ॲड कधी येणार या आपल्या हातात नसलेल्या गोष्टींचा विचार न करता अभ्यास सुरु करावा.... ठेवावा.

**लक्षात ठेवाः** Combined Pre & Mains ही Sprint आहे. ( १ तासाचा खेळ)
मात्र, Combined ची Preparation ही Marathon आहे.

Uploaded by mpscpoint.in

## 4. How ( Perfection नाही तर Excellence)
**(भाग-१)**

- ❖ Syllabus एकदा नीट पाहून घ्या, पाठच असावा अशी गरज नाही.
- ❖ आधी पूर्व की मुख्य : मुख्य ची तयारी कितीही परिपूर्ण असू दया मात्र पूर्व पास झाल्याशिवाय मुख्य परिक्षा देता येत नाही हे अंतिम सत्य आहे. त्यामुळे पूर्वचा अभ्यास आवाक्यात (कट ऑफ पार करण्याचा 'वास्तविक' विश्वास) आल्याशिवाय मुख्य परिक्षेच्या अभ्यासाकडे वळू नये.
- ❖ PYQ : PYQ नीट करा.. पास होण्यासाठी PYQ शिवाय पर्याय नाही.. PYQ तूमचे बेस्ट गाईड आहे.. हे वाक्य तूम्ही खूप वेळा एकले - वाचले असेल मात्र PYQ चा एवढ महत्व का ?
    - ➢ Syllabus चा आवाका कळतो
    - ➢ वाचन, समजून घेणे आणि रट्टा चा भाग वेगळा करता येतो
    - ➢ एखादया टॉपीक ची Depth किती गरजेची आहे ते कळते. (योजनेवरचा प्रश्न मध्ये **सहसा** वर्ष, उद्देश, केंद्र-राज्य वाटा या पलीकडे प्रश्न जात नाही)
    - ➢ एखादा टॉपीक वर किती भर दयायचा ते कळते (उदा. Combined ला सुप्रीम कोर्ट वर जास्त प्रश्न आहेत की हाय कोर्ट वर जास्त प्रश्न आहेत ते बघा त्यावरुन टॉपीकचे प्रायओरिटी ठरवता येते)

**मी वापरलेली पद्धत** : PYQ - वाचन २-३ दिवसानंतर पून्हा PYQ सोडवून पाहणे.
(२-३ दिवसानंतर यासाठी कारण त्याने Retention Capacity कळते)

- ❖ **कमी पुस्तक (Less is More)**

    सध्या पुस्तकांचा पूर आलेला आहे. त्यामुळे सगळे वाचण्याचा नादात कोणताच विषय पूर्ण होत नाही. तेव्हा आपला Subject Source निश्चित करा आणि त्याचाशी Loyal राहा.

- ❖ **Notes: The Ultimate तारणहार**

    जेवढे महत्व PYQ चे तेवढेच महत्व Notes चे. परिक्षेच्या शेवटच्या दिवसात ३००-४०० पेजेसचे पुस्तक घेवुन बसल्यास वाढते.. कार्य वाचू आणि कार्य नाही हे कळत नाही. अश्या वेळी Notes खूप

Uploaded by mpscpoint.in

कामात येतात त्याने वेळ वाचतो आणि फोकस राहतो (माझ्या मराठी या विषयाच्या Notes ३४ पेजेस मध्ये होत्या.)

Notes Consize असाव्यात (आपल्या ग्रंथ तयार करायचा नाही !)

**Don't be Parasite :** दुस-याचा नोट्स वापरण्यापेक्षा स्वतः नोट्स काढण्याचे कष्ट घ्या. त्याने टॉपीक ची Proper Understanding येते. (दुस-याचा नोट्सचा आधार घ्या मात्र पूर्ण अवलंबुन राहू नका)

❖ **Result :**

अभ्यास करतांना Result चा विचार न करता छोटे Realistic Target ठेवून अभ्यास करा. Target Complete करण्याचा १००% प्रयत्न करावा मात्र पूर्ण न झाल्यास त्याचे बर्डन नको.

❖ **Test :**

Test Solve करण्यासाठी Perfect अभ्यास होण्याची वाट पाहू नये कारण Perfect अभ्यास कधीच होत नसतो (Perfect अभ्यास हे मृगजळ !) Test चा उपयोग Time & Stress Management साठी करावा. Test ला मार्क ३० असो कि ७०+ त्याने काही फरक पडत नाही. (I have solved more than 40 test )

❖ **Emotional Stability:**

Exam पास होण्यासाठी सर्वात दुर्लक्ष असलेली बाब आहे. आपण काही भावनाशुन्य रोबोट नाही. इतक्या जिवघेण्या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी आणि जो अभ्यास करतो तो "सफल" होण्यासाठी मन शांत व प्रसन्न, Stable असणे गरजेचे आहे. त्याकरिता विचारांना मोकळी वाट करुन दया.. मग ती कोणासोबतही असो.. आई-वडील, बहीन-भाऊ, मित्र-मैत्रिण (माझ्या साठी Emotional Support माझी Girlfriend होती !)

Uploaded by mpscpoint.in

# Book List

## Combined Group – B Prelims

| | | |
|---|---|---|
| १. | चालू घडामोडी | पृथ्वी परिक्रमा मासिक (मागील १.५ वर्षाचे)<br>(My Approach : Que –data - Que) |
| २. | इतिहास | समाधान महाजन /<br>Spectrum (Ahir Sir) |
| ३. | समाजसुधारक | ज्ञानदीप ॲकेडमी |
| ४. | राज्यशास्त्र | M. Laxmikant /<br>रंजन कोळंबे |
| ५. | पंचायतराज | मनोज सर (चाणक्य मंडल) |
| ६. | विज्ञान | ६-१० State Board (अति महत्त्वाचे) ,Bhaske Sir's Book |
| ७. | भूगोल (महाराष्ट्र) | सवदी |
| ८. | अर्थशास्त्र | दिपस्तंभ प्रकाशन , Dutt & Sundaram(Topic Select करुन वाचावे) |
| ९. | गणित व बुद्धीमता | ढवळे सर (I'm not good at maths so I devoted less time to this subject ) |

Uploaded by mpscpoint.in

**मुख्य परिक्षा**

१. मराठी - मो.रा.वाळंबे

२. इंग्रजी - गणेश कड / महेश पाटील Notes ,

Pal & Suri Exercise

Vocab : Arihant Objective (Personal Suggestion)

३. अर्थशात्र - दिपस्तंभ भाग-२

४. RTI & RTS मुळ कायदे

५. Computer PYQ (Not more than this)

If you have any study related query ,you can contact me on telegram
https://t.me/Amits012
https://instagram.com/pitambareamit

❖ **Without Commitment you'll never start. But more importantly without consistency, You will never finish.**

**All the best !**
**See You Soon !!**

Uploaded by mpscpoint.in